# मराठी (आंतरभारती) : बोर्डाची कृतिपत्रिका (मार्च 2021)

**नोंद :** कोव्हिड-19 मुळे ही परीक्षा घेण्यात आली नाही.

# मराठी (आंतरभारती) : बोर्डाची कृतिपत्रिका (सप्टेंबर 2021)
# (आदर्श उत्तरांसह)

**वेळ : 2 तास]** **[एकूण गुण : 40**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

*(i) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.*

*(ii) आकृत्या पेनानेच काढाव्यात.*

*(iii) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.*

*(iv) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*

---

## विभाग 1 : गद्य

**प्र. 1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) 'मकबरा' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.** 1

माझ्या ग्रंथाला राज्यपुरस्कार मिळाला, माझ्या व्याख्यानमाला गाजल्या, आदर्श प्राध्यापक म्हणून माझा गौरव झाला, मला डी. लिट. मिळाली, राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून माझा सन्मान झाला, 'संतसाहित्यचिंतना'सारख्या माझ्या पुस्तकाला श्रेष्ठ संतसाहित्यविषयक ग्रंथाचा पुरस्कार मिळाला, मला परदेशाची निमंत्रणं आली, की त्या बातम्या सांगणारी जी पत्रं नि तारा माझ्या टेबलावर येऊन पडत, ती पाकिटं फोडून या बातम्या मी प्रथम कुणाला सांगत असे? काचेच्या खिडकीतून माझ्याकडे टक लावून पाहणाऱ्या मकबऱ्याला! मग मकबऱ्याचे मिनार मिस्कीलपणे हसत-डोलत. त्याचा घुमट तरारून येई. माझ्या यशानं त्यालाही तेज चढे. त्याच्या स्नेहशील दृष्टीच्या वर्षावात मी अखंड न्हाऊन निघत असे. माझ्या आयुष्यात या स्नेहाळ क्षणांना फार फार मोलाचं स्थान आहे.

**(2) आकृती पूर्ण करा :** 2

**लेखकाच्या ग्रंथांना मिळालेले पुरस्कार**

↓ [ ] ↓ [ ]

**(3) स्वमत :** 3

मकबरा लेखकाच्या सुखदु:खांच्या क्षणांचा साक्षीदार आहे, हे विधान तुमच्या शब्दांत पटवून द्या.

**प्र. 1. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) चौकटी पूर्ण करा :** 2


(i) मॉरिशसची राजधानी – [ ]

(ii) भारतीय लोक जेथे उतरले तो घाट – [ ]

पोर्ट लुई ही मॉरिशसची राजधानी. तिथे कुलीघाट आहे. पोर्ट लुईच्या बंदरात जिथे भारतीय लोक उतरले, तोच हा कुलीघाट! कलकत्ता (कोलकाता), मद्रास (चेन्नई), मुंबई बंदरावरून जे लोक पोर्ट लुईच्या बंदरात उतरले, त्यातील कोणीच भारतात परतले नाहीत. ते सर्वजण मॉरिशसमध्ये स्थायिक झाले. आपल्या

रक्ताने, घामाने त्यांनी उसाचे मळे शिंपले. त्यांची घरे, त्यांची नातीगोती दूर राहिली. नाती तुटली. ते आडनावे विसरले. त्यांनी नवी नावे घेतली. मॉरिशस हा संस्कृतीचा एक मेल्टिंग पॉट झाला. त्यांच्या श्रमाने देश समृद्ध झाला. १२ मार्च १९६८ या दिवशी मॉरिशसला स्वातंत्र्य मिळाले. आपल्या भूमीच्या बहुरंगी निसर्गसौंदर्याला शोभेल असा लाल, निळा, पिवळा आणि हिरवा असा चौरंगी ध्वज मॉरिशसने निवडला.

**(2) आकृती पूर्ण करा :** **2**




**(3) उत्तर लिहा :** **2**


(i) मॉरिशसला स्वातंत्र्य मिळाले तो दिवस –

(ii) संस्कृतीचा मेल्टिंग पॉट –

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) आकृती पूर्ण करा :** **2**




अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाले टांगला।

पिलं निजले खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला।

खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देख रे मानसा।

तिची उलूशीच चोच
तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात दहा बोटं।

**(2) दिलेल्या काव्यपंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** **2**

अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला

देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाले टांगला।

**प्र. 2. (आ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1) चौकटी पूर्ण करा :**

(i) सोनेरी मुकुट घालणारी – [--------------------] 1

(ii) साळीवर झोपणारी – [--------------------] 1

पिवळे तांबुस ऊन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर.

झाडांनी किति मुकुट घातले डोकिस सोनेरी
कुरणावर शेतात पसरला गुलाल चौफेरी!

हिरवे हिरवेगार शेत हे सुंदर साळीचे
झोके घेते कसे, चहुकडे हिरवे गालीचे!

सोनेरी, मखमली, रुपेरी, पंख कितीकांचे
रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे!

अशी अचल फुलपाखरे फुले साळिस जणु फुलती
साळीवर झोपली जणू का पाळण्यात झुलती.

झुळकन् सुळकन् इकडुन तिकडे किति दुसरी उडती!
हिरे, माणके, पाचू फुटुनी पंखचि गरगरती!

पहा पाखरे चरोनि होती झाडावर गोळा.
कुठे बुडाला पलीकडिल तो 'सोन्याचा गोळा?'

**(2) दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** 2

सोनेरी, मखमली, रुपेरी, पंख कितीकांचे
रंग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनुष्याचे!

## विभाग 3 : भाषाभ्यास

**प्र. 3. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**(1) सूचनेनुसार सोडवा :**

(i) मोर हा कोंबडीच्या जमातीतील पोटजातीचा पक्षी आहे. *(काळ ओळखा.)* 1

(ii) सगळे गंभीर झाले. *(भविष्यकाळ करा.)* 1

**(2) पुढील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा :** 2

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| (i) टेहळणी करणे<br>(ii) शिरशिरी येणे | (अ) अंगावर बारीक काटा येणे<br>(आ) मजा करणे<br>(इ) दुरून पाहणी करणे |

**प्र. 3. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

- **शब्दसंपत्ती :**

**(1) समानार्थी शब्द लिहा :** 1

(i) झाड – [ ] (ii) हात – [ ]

**(2) पुढील शब्दांतील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :** 1

पक्षिसंरक्षण → -------------------- --------------------

**(3) अचूक शब्द ओळखून लिहा :** 1

तालमिला/तालमीला/ताल्मीला/ताल्मिला.

**(4) पुढील विरामचिन्हांची नावे लिहा :** 1

| विरामचिन्हे | विरामचिन्हांची नावे |
|---|---|
| (i) , | ---------------- |
| (ii) ? | ---------------- |

## विभाग 4 : उपयोजित लेखन

**प्र. 4. (अ) पत्रलेखन :** 4

**माहिर स्पोर्टस्**

शिरगाव, पालघर

**खेळाचे साहित्य मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण**

**खेळाडूंसाठी आकर्षक सवलत**

**शैक्षणिक संस्थांसाठी विशेष सवलत**

**संपर्क –** mahir80@gmail.com

व्यवस्थापक

जयेश/जयश्री कुलकर्णी विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

क्रीडासाहित्य खरेदीवर विशेष सवलत दिल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र व्यवस्थापकांना लिहा.

← ***किंवा*** →

क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र व्यवस्थापकांना लिहा.

प्र. 4. (आ) पुढीलपैकी *कोणतीही एक* कृती सोडवा : 4

**(1) पुढील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न असे तयार करा, की ज्यांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील :**

घराच्या वातावरणातून व्यक्तित्व घडते. माझे कुटुंब संगीतप्रेमी, म्हणून मीही संगीताच्या तालावर वाढलो. सुरात म्हटलेल्या कविता, भजन, सिनेमाची गाणी यांनी मी 'तानसेन' झालो. पंडित रविशंकरांची सतार, बिसमिल्लाखाँ साहेबांची शहनाई, शिवकुमारांचे संतुर यांच्या मृगांच्या बरसातीत मी चिंब भिजू लागलो. वाढत्या वयाबरोबर संगीताचं ज्ञानही वाढू लागलं. संगीत हा सर्वांत आनंददायी छंद. म्हणूनच कुठल्याही स्तरावर माणूस त्याचा आनंद लुटू शकतो. संगीताला ना स्थळाचे बंधन ना वेळेचे. व्यक्तिगत तसेच सार्वजनिक मनोरंजनाचे एकमेव साधन म्हणजे संगीत.

**(2) पुढील जाहिरात वाचून त्याखालील कृती सोडवा :**

*–थंड थंड ............ गार गार–*

**झीनत आइस्क्रीम पार्लर**

महाड, जि. रायगड

सर्व प्रकारचे व सर्व चवींचे आइस्क्रीम उपलब्ध

* मँगो * सीताफळ * बटरस्कॉच * व्हॅनिला * ब्लॅकबेरी * टुटीफ्रुटी

**ग्राहकांचे समाधान हेच आमचे ध्येय**

वेळ–सकाळी १० ते रात्री १०

**ऑर्डरसाठी :** ई-मेल – zeenaticecream@gmail.com

- **चौकटी पूर्ण करा :**

(i) आइस्क्रीम पार्लरचे नाव – ☐

(ii) आइस्क्रीम पार्लरचा पत्ता – ☐

(iii) आइस्क्रीम पार्लरची वेळ – ☐

(iv) ऑर्डरसाठी ई-मेल – ☐

**(3) बातमीलेखन :**

स्वानंद माध्यमिक विद्यालय, धुळे येथे 10 फेब्रुवारी रोजी, दुपारी 4.00 वाजता इयत्ता 10वीच्या विद्यार्थ्यांचा निरोपसमारंभ संपन्न झाला. या समारंभाची बातमी तुमच्या शब्दांत लिहा.

**(4) कथालेखन :**

- **पुढील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :**


**मुद्दे :** *तळ्याकाठी एक झाड — झाडावर कबुतर — मुंगी तळ्यात पडणे — कबुतराने पान तोडून तळ्यात टाकणे — मुंगी काठावर येणे — एक शिकारी — कबुतरावर बंदुकीचा नेम धरणे — मुंगीचे त्याला चावणे — कबुतराचा जीव वाचणे.*

प्र. 4. (इ) निबंधलेखन :

पुढीलपैकी *कोणत्याही एका* विषयावर निबंधलेखन करा : 4


(1) वर्णनात्मक :

- दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'माझा आवडता सण' या विषयावर निबंध लिहा :




(2) आत्मकथन :

- चौकटीत लिहिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा :



# बोर्डाच्या सप्टेंबर 2021 च्या कृतिपत्रिकेची उत्तरे

## विभाग 1 : गद्य

**प्र. 1. (अ)**

**(1)** लेखकाला काचेच्या खिडकीतून कोण दिसे?

**(2)** **लेखकाच्या ग्रंथांना मिळालेले पुरस्कार**

- राज्यपुरस्कार
- संतसाहित्यविषयक ग्रंथाचा पुरस्कार

**(3)** लेखकाला मकबऱ्याची आठवण दिवस-रात्र असते. लेखकाच्या जीवनातील हिवाळे, पावसाळे, उन्हाळे मकबऱ्याने पाहिले आहेत. अपूर्व काव्याच्या संपादनाचा अनुभव असो, की शिलालेखांच्या दस्तऐवजांचा अभ्यास असो, त्या एकांताच्या क्षणांत लेखकाच्या आनंदाला केवळ मकबऱ्याने प्रतिसाथ दिली आहे. मकबऱ्याच्या लेखकावरच्या प्रेमाच्या दृष्टीला लेखकाच्या जीवनात फार मोलाचे स्थान आहे. लेखकाच्या सुखदुःखाचा तो भागीदार आहे. लेखकाच्या जीवनाचा मकबरा एक अतूट भाग असल्यामुळे मकबरा लेखकाच्या सुखदुःखाच्या क्षणांचा साक्षीदार आहे, असे म्हणता येते.

**प्र. 1. (आ)**

**(1)** (i) पोर्ट लुई (ii) कुलीघाट

**(2)** **मॉरिशसच्या ध्वजातील रंग**

- लाल
- निळा
- पिवळा
- हिरवा

**(3)** (i) १२ मार्च १९६८

(ii) मॉरिशसमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनी नवी नावे घेतली.

## विभाग 2 : पद्य

**प्र. 2. (अ)**

**(1)** **सुगरणीच्या खोप्याला कवयित्रीने दिलेल्या उपमा**

- झुलता बंगला
- गिलक्याचा कोसा

**(2)** <u>सरळ अर्थ :</u> सुगरणीचे घरटे बांधण्याचे कौशल्य सांगताना बहिणाबाई म्हणतात – अरे माणसा, सगळ्या घरट्यांमध्ये सर्वांत सुंदर व चांगले घरटे सुगरण बांधते. पाहा, तिने पिलांच्या सुरक्षिततेसाठी आपला खोपा झोक्यासारखा झाडाला टांगला आहे.

**प्र. 2. (आ)**

**(1)** (i) झाडे (ii) फुलपाखरे.

**(2)** सरळ अर्थ : संध्याकाळच्या सुंदर मनोहारी दृश्याचे वर्णन करताना कवी म्हणतात – सोनेरी, मखमली, चंदेरी आणि इंद्रधनुष्यातील निरनिराळ्या रंगांचे पंख फडफडवीत फुलपाखरे भाताच्या शेतावर भिरभिरत आहेत.

## विभाग 3 : भाषाभ्यास

**प्र. 3. (अ)**

**(1)** (i) वर्तमानकाळ

(ii) सगळे गंभीर होतील.

**(2)** (i) टेहळणी करणे – दुरून पाहणी करणे.

(ii) शिरशिरी येणे – अंगावर बारीक काटा येणे.

**प्र. 3. (आ)**

**(1)** (i) झाड – वृक्ष (ii) हात – कर

**(2)** पक्षिसंरक्षण → पक्ष क्षण

**(3)** तालमीला.

**(4)** (i) , → स्वल्पविराम (ii) ? → प्रश्नचिन्ह

## विभाग 4 : उपयोजित लेखन

**प्र. 4. (अ), (आ), (इ) :**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तरे लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी यांची उत्तरे स्वत: लिहावीत.

स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

***